# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.वेबसाईट: www.msbnpe.org ई-मेल- msbnpe@gmail.com ,मो. नं: ०२२-२२६११०१५

MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai - 400 001 Website: www.msbnpe.org E-mail- msbnpe@gmail.com, Mobile No- ०२२-२२६११०१५


---

क्र. मराशुवपशिमं/परीक्षा अर्ज/५८२१/२०२२ दि.२५/११/२०२२

**तात्काळ**

प्रति,
प्राचार्य/परिचर्या अधिकारी/संस्थाप्रमुख,
सर्व संलग्न परिचारीका प्रशिक्षण संस्था,

विषय: - शैक्षणिक वर्ष २०२१-२२ जी.एन.एम.द्वितीय वर्ष कोर्स नियमित परिक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज व अंतर्गत टर्म मुल्यमापन पुन्:श्च भरणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व संलग्नीत महाविद्यालयातील संस्थाप्रमुख व प्राचार्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ जी.एन.एम. द्वितीय वर्ष कोर्स नियमित परिक्षेसाठी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने ऑनलाईन परीक्षा फॉर्म **सर्व संस्थांसाठी पुन्:श्च उपलब्ध केलेले आहेत**. संस्थानी परिक्षेचे फॉर्म ऑनलाईन पध्दतीने २५/११/२०२२ ते २८/११/२०२२ पर्यंत भरावेत. ऑनलाईन फॉर्म भरताना खालील पध्दतीचा वापर करावा.

विद्यार्थी परीक्षा नोंदणी (Student Exam Enlloment) २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी Student Exam Enrlloment साठी वापरण्यात आलेल्या User ID व Password वापरण्यात यावा. विद्यार्थ्यांचा पी.आर.एन. क्रमांक टाकून विद्यार्थी परिक्षा नोंदणी करावी.

विद्यार्थी परिक्षा अर्ज (Online Exam Application)- विद्यार्थी परिक्षा नोंदणी झाल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांचे परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने पी.आर.एन. क्रमांक टाकून अर्ज करावयाचे आहेत.

**ज्या संस्थांनी परिक्षा शुल्क भरलेले नाहीत अशा संस्थांनी दिनांक २८/११/२०२२ ते ३०/११/२०२२ पर्यंत भरण्यात यावे.** शुल्क भरताना खालील पध्दतीचा अवलंब करावा. परिक्षा शुल्क भरण्याबाबत - परिक्षा शुल्क भरण्यासाठी पेमेंट मेन्यु मध्ये जाऊन Pay online (Blue Button) वरती क्लिक करुन payment करावे. NEFT/RTGD/DD या पध्दतीने केलेले परिक्षा शुल्क स्विकारण्यात येणार नाही. याची सर्व संलग्नीत संस्थानी नोंद घ्यावी.

अंतर्गत टर्म नुसार मुल्यमापन गुणांची नोंदणीबाबत - सदर परिक्षेसाठी फ्रेशर ( म्हणजेच जुन्या बॅचचे असे विद्यार्थी ज्यांनी सदर परिक्षा दिली नाही) असणाऱ्या विद्यार्थ्यांचे टर्म १ व टर्म २ अंतर्गत मुल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक २८/११/२०२२ ते ३०/११/२०२२ पर्यंत करण्यात यावी.

अंतिम अतंर्गत मुल्यमापन गुणांची नोंदणी दिनांक ३०/११/२०२२ ते ०२/१२/२०२२ पर्यंत करावी. **विहीत कालावधीत वरील बाबी पुर्ण न केल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस संस्था जबाबदार राहतील याची नोंद घेण्यात यावी.**

टिप : काही अडचणी असल्यास पुढील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा - ८९७६२७९९३१

प्रबंधक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत

१. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.
२. मा. विशेष कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई.